साप्ताहिक

# स्मृतिगंध



साप्ताहिक | परभणी | वर्ष १ ले | अंक ६ रा | सोमवार, दिनांक १४ जुलै २०२५ MHMAR/25/A0681 | पाने – ४ | किंमत ५ रु.

Weekly | Parbhani | Year 1 | Issue 6 | Monday, Date 14 July 2025 MHMAR/25/A0681 | Pages 4 | Price 5/-


# हेमोफोलिया आजारावरील हेमलिब्रा इंजेक्शनचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते लोकार्पण

## रुग्णांना आरोग्य विभागामार्फत उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार

**परभणी :** हिमोफेलिया आजारावरील हेमलिब्रा इंजेक्शन आपल्या जिल्ह्यात उपलब्ध झाल्याने हिमोफेलीया रुग्णांना उपचारासाठी जिल्ह्याच्या बाहेर जाण्याची गरज भासणार नाही. येणाऱ्या काळात रुग्णांना आरोग्य विभागामार्फत उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य कुटुंब-कल्याण, पाणी पुरवठा-स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

जिल्हा सामान्य रुग्णालयात आज पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते हिमोफेलीया रुग्णांसाठीच्या हेमलिब्रा इंजेक्शनचे लोकार्पण पार पडले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सारिका बडे, हिमोग्लोबिनोपॅथीचे राज्य समन्वयक लक्ष्मीकांत पिंपळगावकर, किरण नांदेडकर, अजित लांब, मनोज मोरे, नंदकिशोर सारंग, मनीषा राठोड, विलास बुद्रुक यांची उपस्थिती होती. श्रीमती बोर्डीकर यांनी हेमोफिलियाग्रस्त रुग्णांची तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रथमच कॅन्सरचे ऑपरेशन झालेल्या रुग्णाला भेट देऊन त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

त्या म्हणाल्या की, हिमोफेलिया आजारावरील हेमलिब्रा इंजेक्शन आपल्या जिल्ह्यात उपलब्ध करून देणारा परभणी हा राज्यातील पहिला जिल्हा आहे. त्यामुळे हिमोफेलिया रुग्णांना दिलासा मिळाला आहे. कॅन्सर ऑपरेशन आपल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात झाले, ही एक आपल्या परभणीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. त्याकरीता जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व अधिकारी व स्टाफचे अभिनंदन. येणाऱ्या काळात आरोग्य विभागामार्फत रुग्णांना चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व डॉक्टर, नर्स, स्टाफ यांची उपस्थिती होती.







### हिमोफेलीया रक्ताचा अनुवंशीक आजार

हिमोफेलीया हा रक्ताचा अनुवंशीक आजार असुन माता ह्या आजाराची वाहक आहे ; परंतु मातेला या आजाराचा कुठलाही त्रास होत नाही. मात्र पुरुष अपत्यास मातेकडुन हा वाहक आल्यास अशा बालकास होणारा रक्तस्राव थांबत नाही.रक्त गोठण्यासाठी आवश्यक असलेल्या ऋरलींशअॅ ८ षरलींशअॅ ९ या घटकाची बालकांमध्ये कमतरता असल्यामुळे बालकास रक्तस्त्राव झाल्यास त्यांना रक्त थांबविण्यासाठी फॅक्टर ८ व फॅक्टर ९ हे घटक दिल्यासच रक्त स्राव थांबतो.

सदरील फॅक्टर ८ व फॅक्टर ९ हे घटक घेण्यासाठी परभणी व नजीकच्या जिल्ह्यातील पालकांना मुंबई, पुणे येथे जावे लागत होते गेल्या ६ वर्षापासुन परभणी जिल्ह्यात जिल्हा रुग्णालयात सदरील घटकांची उपलब्धता झाल्यामुळे रुग्णांचा वेळ पैसा व जीव वाचवण्यास मदत झाली.

मात्र, फॅक्टर ८ व फॅक्टर ९ या घटकाचा प्रभाव फार कमी कालावधीसाठी असतो ही बाब लक्षात घेऊन परभणी जिल्ह्यातील हिमोफेलीया रूग्णाकरीता अत्याधुनिक उपचार असलेले हेमलीब्रा हे इंजेक्शन परभणीतील शासकिय रुग्णालयात उपलब्ध करण्यात आले आहे. सदरील इंन्जक्शनचा प्रभाव दिर्घ कालावधीसाठी राहत असल्यामुळे हिमोफेलीया ग्रस्त रुग्णांचे आयुष्यमान सुखकर होण्यास मदत होणार.

परभणी जिल्ह्यात एकुण हिमोफेलीयाचे ४८ रुग्ण असुन महाराष्ट्रात प्रथमच परभणी येथे हिमोफेलीयाग्रस्त रूग्णांसाठी अत्याधुनिक हेमलीब्रा इंजेक्शन उपलब्ध करण्यात आले आहे.

# जि. प. मुख्य इमारतीवरील अग्निशमन यंत्रणेत निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर ; शिवसेनेचे नेते रविंद्र देशमुख यांच्याद्वारे एजन्सीधारकाच्या कसून चौकशीची मागणी

## निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले, नियमबाह्य मंजूरी व देखरेखीबाबत जबाबदारी ठरवावी –जय इंटरप्रायजेसवर आरोप

**परभणी : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीवर अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या कामात अनेक तांत्रिक त्रुटी व निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला असून त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणात कसून चौकशी करीत संबंधित एजन्सीधारकाविरुध्द कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेचे नेते रविंद्र देशमुख यांनी केली आहे.




जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीवरील या अग्निशमन यंत्रणेच्या कामांसदर्भात आपण जूलै २०२३ मध्ये माहिती अधिकार कायद्यानुसार माहिती मागविली होती. परंतु, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने या संबंधिची माहिती आजपर्यंत आपणास पुरविली नाही. मध्यंतरी आपण अपघातामुळे सुमारे सहा महिने उपचार घेत होतो. त्यामुळे या प्रकरणाचा पाठपुरावा करु शकलो नाहीत, असे नमूद करीत देशमुख यांनी अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या काम ाची सखोल चौकशी करणे नितांत गरजेचे आहे. या मुख्य इमारतीवरील अग्निशमन यंत्रणा बसविण्याचे काम जय इंटरप्रायजेस परभणी या कंत्राटदारामार्फत केल्या गेले. परंतु, या कामात अनेक त्रुटी आहेत, निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला आहे. त्यामुळे ज्यांनी हे काम नियमबाह्य मंजूर अथवा देखरेख केली.

त्यांच्या जबाबदारीचा शोध घ्यावा, तांत्रिक त्रुटी व गुणवत्तेतील फरकाची संलग्न यादी तपासावी, मानकानुसार आवश्यक त्या दर्जाचे पाईप व अन्य साहित्य संबंधित एजन्सीधारकाने वापरले आहेत का हे तपासावे, तसेच आयएस मानकाचे थेट उल्लंघन एजन्सीधारकाने केल्याचे नमूद करीत या प्रकरणात अनेक त्रुटी आहेत, हे निदर्शनास आणून दिले.


Scanned with OKEN Scanner

# युवापिढी ऑनलाइन जुगारच्या विळख्यात

**ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे.**

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे. ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण



एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे. चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. गेल्या वर्षी झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगाराच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.



## तरायचे नि मरायचे

कोरले तुझे नाव
सदाहरीत भूवरी
छंद लागला तुझा
धोका दिलास जरी
हेटाळणी माझी सरकार दरबारी
खासगीत सांगतो जीव होता तुझ्यावरी
थोडे शीतल करून नव्हतेस चुचकारायचे
दिवसामागून दिवस सरायचे
मनाने मनामध्ये झुरायचे

लावून पेरणीच्या नादी
गरजूनी रोज इशारे द्यायचे
दिवसामागून दिवस सरायचे
मनाने मनामध्ये झुरायचे

का उगाच रुसायचे
तुझे बहाणे नाही कळायचे
ऐन मोसमात रुसवा धरितो
अन् आतुरतेने वेडावून सोडतो
वटारून डोळे तर पहायचे
पण पाणावलेल्या नजरेने तुलाच
न्याहाळायचे
दिवसामागून दिवस सरायचे....

पानावलेला तुही
दिशा फिरतो दाही
गरज असूनी ज्याला
वाट पाहायला लावतो त्याला
नाही ऐकेले मी दाखले कुणाचे
पाणी पाणी करितोस अचानक भरवशाचे
दिवसामागून दिवस सरायचे....

निसटता तरी घालितो घाव
चांदण्याविणा आनितो सुंदरतेचा आव
धरेवरचा राग काढावा
बळीराजाचा बांध फुलावा
व्यवस्थेने छळू देत किती छळायचे
आता तुझ्यावरच आहे तरायचे नि मरायचे
दिवसामागून दिवस सरायचे
मनाने मनामध्ये झुरायचे.

**पदमाकर उखळीकर ,**
मो.9975188912.
kalpadmakarukhlikar@gmail.com.

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो. आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो,



अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

# महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५

दीड वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ गड आणि किल्ले जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करावेत अशी शिफारस केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनिस्कोकडे केली होती. केंद्रीय सांस्कृतीक मंत्रालयाने युनेस्कोकडे शिफारस केलेल्या या यादीत रायगड, प्रतापगड , साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, राजगड, सुवर्णगड, पन्हाळगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व तमिळनाडू मधील जिंजी या बारा किल्ल्यांचा समावेश आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने युनेस्कोकडे केलेली ही शिफारस मान्य झाली असून शिवरायांचे हे १२ किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा युनेस्कोने नुकतीच केली. शिवरायांचे हे बारा किल्ले युनेस्कोच्या वारसा यादीत समाविष्ट होणे ही अभिमानाची बाब आहे. शिवरायांचे हे बारा गड किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट होणे हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान आहे. या घोषणेने जगभरातील मराठी माणसांची छाती फुगली आहे. जगभरातील मराठी जणांसाठी हा सुवर्णक्षण आहे. या क्षणाची प्रतिक्षा मराठी माणूस गेली कित्येक शतके करत होता. शिवरायांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे मतदान पार पाडले यात अनेक देशांनी भारताच्या बाजूने मतदान केले आणि शिवरायांच्या गड किल्लयांना हा बहुमान प्राप्त झाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराजांचा ऐतिहासिक ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला. अर्थात हा प्रवास सोपा नव्हता शिवरायांच्या या गड किल्लयांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी भारताचे एक शिष्टमंडळ गेल्या अनेक महिन्यांपासून कठोर परिश्रम घेत होते. त्यासाठी या शिष्टमंडळाने वीस देशांशी समन्वय साधला. आंतरराष्ट्रीय स्तरावर या शिष्टमंडळाने या गड किल्लयांच्या जागतिक वारसा यादीत समावेश का असावा हे पटवून दिले. महाराष्ट्र सरकार, देशाचे सांस्कृतिक मंत्रालय, भारतीय पुरातत्व खाते आणि भारताचे परराष्ट्र मंत्रालय यांचे यासाठी आभारच मानावे लागेल. त्यांच्या एकत्रित प्रयत्नानेच हे साध्य झाले. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना शिवरायांनी हे गड किल्ले बांधले, जिंकले. हे गड किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्लयांची माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. ही माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेच्या आणि युद्ध कौशल्याचा मुत्सद्दीनितीने रचलेला भाग आहे हेच अद्वितीय वैश्विक मूल्य आहे.

Scanned with OKEN Scanner

# जिल्ह्यातील ४३ हजार शेतकर्यांना १७.६५ कोटींची थकीत पिकविम्याची रक्कम १५ दिवसात मिळणार

## राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती : आमदार राजेश विटेकर यांची लक्षवेधी

**परभणी : प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील सुमारे ४३ हजार ९६० शेतकर्यांना देय असलेली पिकविम्याची थकीत १७.६५ कोटी रुपयांची रक्कम येत्या १५ दिवसांत शेतकर्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत दिली. आमदार राजेश विटेकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.

आमदार विटेकर यांनी विधानसभेत एका लक्षवेधीमधून राज्याचे कृषिमंत्री कोकाटे यांची पिकविम्याच्या थकलेल्या रकमेसंदर्भात प्रश्नांची सरबत्ती केली. जिल्ह्यातील सर्वसामान्य शेतकरी पिकविम्याच्या रक्कमे संदर्भात मोठ्या अपेक्षा बाळगून असतांना या कंपनीने शेतकर्यांना उल्लू बनविण्याचे धोरण अवलंबविले आहेत, असा गंभीर आरोप केला. त्या पाठोपाठ ७ मे रोजी जिल्हाधिकारी परभणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पिकविमा कंपनीस दिलेल्या सूचनांची



अंमलबजावणी झाली का? ४ जून रोजी कृषी मंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीतील आदेशानुसार राज्य शासनाच्या पिककापणी प्रयोगाविरोधात कंपनीने दाखल केलेल्या अपीलावर कोणती कारवाई झाली? नावात चूक, क्षेत्रातील त्रुटीमुळे वंचित राहिलेल्या शेतकर्यांना मदत मिळण्यासाठी काय पावले उचलली? आणि ज्या शेतकर्यांच्या पिक क्षेत्रावर नुकसान पंचनामे न करता अपात्र ठरवले गेले, त्याबाबत शासनाच्या पंचनाम्यांना ग्राह्यता देण्याबाबत कोणती पावले उचलली गेली? या गोष्टीचा खूलासा व्हावा, असे ते म्हणाले.

कृषिमंत्री कोकाटे म्हणाले की, शासनाच्या प्रयोगांनुसार पिकांचे नुकसान झाले असल्याचे स्पष्ट आहे. मात्र विमा कंपनीने प्रयोग अमान्य केल्याने विभागीय आयुक्त स्तरावर सुनावणी सुरू असून त्याचा निर्णय लागल्यानंतर शेतकर्यांना तात्काळ मदत वितरित करण्यात येईल. दरम्यान, विविध तांत्रिक त्रुटीमुळे मदतीपासून वंचित राहिलेल्या शेतकर्यांच्या प्रकरणांची तपासणी करून जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयमार्फत त्यावर कार्यवाही केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पाथरी तालुक्यातील ४९ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदांचे आरक्षण जाहीर

## २८ सर्वसाधारण, अनुसूचित जाती व मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित

## आरक्षण सोडत तहसीलदार एस. एन. हानदेशवार यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभागृहात पार पडली

**पाथरी : प्रतिनिधी**

तालुक्यातील ४९ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडतीसाठी ची सभा येथील पंचायत समिती सभागृहात सकाळी ११ वाजता तहसीलदार एस. एन. हानदेशवार यांच्या अध्यक्षतेखालीआयोजित केली होती. सभेच्या सुरुवातीस अनुसुचित जातीचे सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. मंजरथ, लिंबा, लिंबा तांडा, लोणी बु. व मसला खुर्द, मसला




तांडा या ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण हे अनुसूचित जाती पुरुषांसाठी निश्चित करण्यात आले तर बांदरवाडा, मुद्दगल, बोरगव्हाण, पाथरगव्हाण बु.यांचे सरपंच पदाचे आरक्षण हे अनुसूचित जाती महिलासाठी निश्चित करण्यात आले. तर नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुषांसाठी विटा बु. चाटे पिंपळगाव,हादगाव बु.झरी, खेडूळा, रेणाखळी तर नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलासाठी बाणेगाव,गोरेगाव, जैतापुरवाडी/समर्थ नगर,रेणापु, डोंगरगाव,फुलारवाडी यांचे आरक्षण निश्चित करण्यात आले.तर सर्वसाधारणसाठी २८ ग्रामपंचायतीची सोडत काढण्यात आली

त्या पैकी १४ पुरुषांसाठी तर १४ महीलासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले.पुरुषासाठी आनंदनगर, पोहेटाकळी, पाथरगव्हाण खुर्द,निवळी, गुंज खुर्द, डाकु पिंपरी/तारू गव्हाण, मर्डसगाव/ श्रीरामपूर वस्ती, उमरा, जवळा झुटा, रामपुरी खुर्द, वडी, नाथरा, बाभळगाव, बाबुलतार,तर महीला साठी सारोळा बु. सिमुरगव्हाण, कासापुरी, अंधापुरी,देवेगाव, देवनांद्रा, कानसुर/ कानसुर तांडा, वरखेड/ कीन्होळा, मालेगाव, खेर्डा/सारोळा खुर्द, गौंडगाव, पाटोदा गंगा. की., टाकळगव्हाण/तांडा,वाघाळ या ग्रामपंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण महिला सर्वसाधारण साठी निश्चित करण्यात आले. या सभेसाठी तालुक्यातील सरपंच, पदाधिकारी,नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बहुजन समाजाने ताकदीनिशी उतरावे - रानबा गायकवाड



**परळी : प्रतिनिधी**

आगामी काही महिन्यात महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सुरुवात होणार असून बहुजन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी या सर्व निवडणुकांमध्ये बहुजन समाजाने पूर्ण ताकतीनीशी उतरावे असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड यांनी केले आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात रानबा गायकवाड यांनी म्हटले आहे की, महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्ता ही विकासासाठी महत्वाची शक्ती असल्याचे म्हटले आहे.मग ती लोकसभा असो अथवा विधानसभा.तिथे बहुजनांचे प्रतिनिधी असले पाहिजेत. सध्या आरक्षणाच्या माध्यमातून जे काही उमेदवार विविध पक्षातून निवडून येतात ते त्यांच्या पक्षाचा अजेंडा राबवितात. त्यांना बहुजन समाजाच्या प्रश्नावर काही देणे घेणे नसते.

त्यामुळे लोकसभा विधानसभा हे कायदे निर्माण करणारे सभागृह आहेत. तर महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून गाव पातळीवरील उपेक्षित, कष्टकरी, मागासवर्गीय, बहुजन समाजाचे विकासाचे प्रश्न सोडवता येऊ शकतात. जो विकास निधी बहुजनांसाठी आलेला आहे. जो दलित वस्ती विकास योजना, दलित महिला विकास योजना, आदिवासी विकास योजना, ओबीसी विकास योजना अशा प्रकारच्या अनेक शासकीय योजनांकरिता गाव पातळीवर कोट्यावधी रुपये येत असतात. परंतु सत्ताधारी मात्र बहुजन विचारधारेचे नसल्यामुळे या योजनांमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला जातो. गाव पातळीवर दलित वस्तीतीतील विकास कामे बोगस केले जातात. किंवा काम न करताच निधी हडप केला जातो. अशा भ्रष्टाचारामुळे बहुजन सम ाजाचे प्रश्न आजही सुटलेले नाहीत. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकास खुंटला आहे.याकरिता आगामी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये बहुजन समाजाने मोठ्या संख्येने आपले उमेदवार उभे करावेत, बहुजन समाजाचे, समाजासाठी आवाज उठविणा-या पक्षांना, उमेदवारांना विजयी करावे असे आवाहनही जेष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड यांनी केले आहे.

# पंढरपूर वारी करुन परतलेल्या शेतकऱ्याचा शॉक लागून मृत्यू

**पाथरी** : एका महिन्याची पंढरीची वारी पूर्ण करुन, विठ्ठलनाम गात तल्लीनतेने पायी चालत घरात परतलेल्या शेतकऱ्याला मृत्यू आलिंगन देईल, हे कुणालाही स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते...पण नियतीचा खेळ वेगळाच ठरला. पायी पंढरीची वारी पूर्ण करुन घरात परतलेल्या शेतकऱ्याचा शेतात काम करताना दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार(दि.११ जुलै) सकाळी ७ वाजता पाथगव्हाण बु. शिवारात घडली.

पंढरपूर वारीतून परतलेले शेतकरी प्रल्हाद गोपाळ घांडगे(वय ४०) हे आपल्या बैलजोडीसह शेतात पाळी घालत असताना लोखंडी जुवाला विजेच्या तारेचा स्पर्श झाल्याने जागीच ठार झाले. या दुर्दैवी घटनेत त्यांच्यासोबत असलेले दोन्ही बैलही जागीच मृत्यूमुखी पडले. यावेळी प्रल्हाद यांचे भाऊ विकास घाडगे(वय ३२) पाठीमागे खत पेरणी करत होते. सुदैवाने ते बालबाल बचावले.

पाथरी तालुक्यातील पाथरगव्हाण येथील वारकऱ्यांची पायी दिंडी दरवर्षी पंढरपूरला जाते. गावातील प्रल्हाद घांडगे हे मागील काही वर्षांपासून पंढरपूर वारी नित्यनेमाने करायचे. यंदाही ते गावकऱ्यांसोबत पायी पंढरपूरला गेले. महिनाभर वारीत असल्याने वारीतून परत येताच शेतात रखडलेली कामे पूर्ण करण्याचा बेत आखला. आज सकाळी ते आपल्या भावासोबत शेतातील कापसाला खत देण्याच्या कामाला लागले. पेरणी करत असताना ते औत हाणत होते, तर भाऊ खताची पेरणी करत होता. यादरम्यान, औताच्या लोखंडी जुवा उघड्या विजेच्या तारेला लागला.

# शासकीय कामात अडथळ्याप्रकरण: संजय जाधव यांच्यासह ३२ शिवसैनिकांची निर्दोष मुक्तता

**परभणी : प्रतिनिधी**

वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात आपल्या विविध मागण्यांसाठी ठाण मांडून शासकीय कामात अडथळा आणल्याच्या प्रकरणी गंगाखेड येथील अप्पर जिल्हा सत्र न्यायालयातील खटल्यात खासदार संजय उर्फ बंडू जाधव यांच्यासह ३२ शिवसैनिकांची अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. डी. कुरुलकर यांनी ११ जुलै रोजी दिलेल्या निकालाद्वारे निर्दोष मुक्तता केली.

७ डिसेंबर २०१७ रोजी परभणी येथील वीज महावितरण (म.रा.वि.कं.) कार्यालयात कृषी पंपांना त्वरीत कनेक्शन द्यावे, नवीन डीपी बसवावा, डीपीचे शुल्क ५ हजाराऐवजी २ हजार रुपये आकारावे यासह अन्य मागण्यासाठी खासदार संजय जाधव यांच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी आंदोलन केले होते. यावेळी आंदोलकांनी गैरकायद्याची गर्दी जमवून अधिकार्यांना दमदाटी करत कार्यालयाबाहेर काढून कुलूप लावले, तसेच परभणी-जिंतूर रस्ता अडवून महावितरण संचालकांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला. या प्रकरणात संबंधितांविरुध्द पोलिस ठाण्यांमधून गुन्हा दाखल करण्यात आला. पुढे न्यायालयात या संदर्भात खटला उभा राहिला.

खासदार संजय जाधव, डॉ. विवेक नावंदर, भाजपचे संतोष मुरकुटे, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते राम पाटील, शिवसेना शिंदे गटाचे उपजिल्हाप्रमुख माणिक पोंढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पंढरीनाथ घुले, शेख शब्बीर, संदीप भंडारी, अर्जुन सामाले, संजय सारणीकर, मधुकर निरपणे, सदाशिव देशमुख, प्रभाकर वाघीकर, नितेश देशमुख, सुशील कांबळे, रवी कांबळे, विवेक कलमे, सोमनाथ धोते, सखुबाई लटपटे, रामप्रसाद रणेर, कुसुम पिल्लेवार, अंजली पवार, सचिन भोजने, शेख हजू, सचिन पवार यांच्यासह एकूण ३२ शिवसैनिक गुन्हेगार आहेत, असा आरोप होता. या प्रकरणात सरकार पक्षाने न्यायालयात दोषारोपपत्र सादर करत सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवली. मात्र, त्यांच्या जबाबांमध्ये आढळलेल्या विसंगतीमुळे आरोपीविरुद्ध कोणताही ठोस पुरावा आढळून आला नाही. त्यामुळे न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात ॲड. मनोज काकाणी यांनी आरोपींची बाजू मांडली. त्यांना ॲड. प्रल्हाद डमरे, ॲड. साधना जाधव व ॲड. वर्षा भुतडा यांनी सहकार्य केले.

Scanned with OKEN Scanner

साप्ताहिक

# स्मृतिगंध

“काम लवकर करावयाचे असेल तर मुहूर्त पाहण्यात वेळ घालवू नका.”





सोमवार, दिनांक १४ जुलै २०२५

## माळीवाड्यातील घरफोडीतील ९ लाख ७३ हजारांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीस सुपूर्द

**पाथरी : प्रतिनिधी**

पाथरी शहरातील माळीवाडा भागात दि. १२ जून २०२५ रोजी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास साहेबराव किशनराव मोनोलीकर यांच्या घरी घरफोडी झाली होती. या घरफोडीत मानोलीकर यांच्या घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरट्यांनी चोरून नेली होती. या घटनेप्रकरणी पाथरी पोलीस स्टेशन मध्ये भारतीय न्याय संहीता गु.र.नं.३३१/२०२५ कलम ३३१ (४) , ३ (५)गुन्हा दाखल करण्यात आला होता. या चोरीच्या घटनेचा तपास जलद गतीने करून आरोपींना पोलिसांनी अटक केली होती. या गुन्ह्यात आटक केलेल्या



आरोपींनी साहेबराव मामुलीकर यांच्या घरी घरपोडी केल्याची कबुली देऊन, सोन्याचे दागिने व रोख रक्कम नेल्याची मान्य केले.दि.१०/७/२०२५ रोजी पाथरी येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे आदेश जा. क्र.फौ.१०२८/२०२५ माळीवाडा येथील फिर्यादी साहेबराव किशनराव मानोलकर यांच्या ताब्यात २५.५०. ग्रॅम. २१००० रुपये किंमतीचे एक सोन्यासारख्या धातूचे गंठण,२०.१० ग्रॅम वजनाचे १७५००० रुपये किमतीचे सोन्यासारख्या पिवळ्या धातूचे गंठण, १२.१० ग्रॅम वजनाचे १०४००० रुपये किमतीचे सोन्यासारख्या पिवळ्या धातूचे गंठण, ०५ ग्रॅम ४६००० रुपये किमतीचे एक सोन्यासारख्या पिवळ्या धातूची बदामी अंगठी, ०३ ग्रॅम वजनाची २४००० रुपये किमतीचे सोन्यासारख्या पिवळ्या धातूची अंगठी, ६.४० ग्रॅम वजनाचे ५५००० रुपये किमतीचे झुंबर जोड, २७००० रुपये किमतीचे ०३ ग्रॅमच्या दोन अंगठ्या, अशी एकूण किंमत सहा लाख ७३ हजार रुपये तर भारतीय चलनाच्या ५०० रुपयाच्या सहाशे नोटा त्याची एकूण किंमत तीन लाख रुपये असा एकूण नऊ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादी साहेबराव मानोलीकर यांच्याकडे परभणी जिल्हा पोलीस अधीक्षक परदेशी,अप्पर पोलीस अधीक्षक काळे, व सेलू विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथरीचे पोलीस निरीक्षक महेश लांडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके, पोलीस हेडकॉन्स्टेबल अशोक झमकडे यांनी सुपूर्द केला.

## गौंडगाव येथे अवैध वाळुचा वीस ब्रास रेतीसाठयासह,६ लाखांचा मुद्देमाल जप्त



### पाथरी पोलिसांची धडक करावी

**पाथरी : प्रतिनिधी**

गोदावरी नदीपात्रातुन गेल्या अनेक दिवसांपासुन अवैध वाळू उपसा करून वाळूची चोरी करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. त्यामध्ये गोदाकाठावरील गौंडगाव हे वाळू चोरी व विक्रीचे केंद्राचे बनले आहे. गौंडगाव व आजूबाजूच्या खेड्यातील अनेक वाळू तस्कर येथे नेहमी सक्रिय असतात. महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना आम्ही हप्ते देऊन हा व्यवसाय विनाखंड नेहमी चालू ठेवतो असे ते छातीठोकपणे सांगतात. गोंडगाव येथे अवैध वाळू उपसा करणाऱ्या रेती माफियावर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहीतीवरुन आज दि.१२ जुलै शनिवार रोजी सकाळी ७: ३५ वाजता हनुमान हरीभाऊ कोल्हे हा स्वतःच्या शेताजवळ विनापरवाना वादळाचा साठा करून अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने टिप्पर मध्ये भरत असताना पोलीस त्या ठिकाणी पोंहताच,त्याने पळ काढला.या ठिकाणी असलेला एक लाख रुपये किंमतीचा वीस ब्रास वाळुसाठा व पाच लाख रुपये किंमतीचा जुन्या वापरातील टाटा कंपनीचा टिप्पर क्रमांक एम.एच.०४ एफ.एल.६७९१ असा एकुण सहा लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त करुन सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल कुरुंदकर यांच्या फिर्यादीवरून हनुमान हरीभाऊ कोल्हे यांच्यावर कलम ३०३(२)३(५) भारतीय न्यायसंहिता.२२३ सहकलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा तपास चितळे हे करत आहेत. पाथरी तालुक्यात गोदाकाठावरील गुंज गोंडगाव नाथरा मरडगाव आदी गावातून रात्रंदिवस रेती माफिया अनाधिकृत वाळू उपसा करून चोरटी वाहतूक करून विक्री करत आहेत. हा प्रकार गेल्या एक वर्षापासून दिवस रात्र सुरू आहे. पाथरी येथील महसूल विभागाकडून रेतीमाफीया याविरुद्ध कोणतीच ठोस कार्यवाही करण्यात येत नाही. आठवड्यात पाथरी पोलिसांनी अवैद्य रीती वाळू वाहतूक व विक्री करणाऱ्या वाहनाविरुद्ध धडक मोहीम उघडून चार कारवाया केल्या आहेत.

## अन्नसुरक्षा व अंत्योदय योजनेचे उद्दीष्ट वाढवा

### आमदार डॉ. राहुल पाटील यांची विधानसभेत मागणी

**परभणी/प्रतिनिधी**

अन्न व पुरवठा विभागाच्या अन्नसुरक्षा आणि अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांची उद्दिष्ट संख्या वाढवून अन्नधान्याचा लाभ द्या, अशी मागणी आमदार डॉ.राहुल पाटील यांनी बुधवारी (दि.९) केली.

विधानसभेच्या अधिवेशनामध्ये आमदार पाटील यांनी अन्नसुरक्षा योजनेतील वंचित लाभार्थ्यांचा प्रश्न उपस्थित केला. परभणी तालुक्यात अन्नसुरक्षा योजनेची ६० हजार आणि अंत्योदय योजनेचे पाच हजार लाभार्थ्यांना अजूनही योजनेचा लाभ मिळत नाही याबाबत तक्रार केली असता अन्न व पुरवठा विभागाने खोटी माहिती देत सभागृहाची आणि जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप आमदार डॉ.पाटील यांनी केला.


तहसीलदारांचे पत्र असतानाही पुरवठा विभागाकडून शिलकी इष्टांक दाखवत खोटी माहिती कशी दिली जाते असा प्रश्न सभागृहात करत पुरवठा विभागाला धारेवर धरले. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात अन्नसुरक्षा योजनेसाठी लाभार्थी उद्दिष्ट दिले जाते हे चुकीचे आहे, पंधरा वर्षात वाढलेली लोकसंख्या आणि महागाई पाहता प्रत्येक तहसील कार्यालयांचे उद्दिष्टे वाढवून द्यावे, अशी मागणी केली. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याप्रमाणे राज्यात देखील हा कायदा




करावा अशी मागणी केली. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर ही अजूनही गोरगरीब नागरिकांना पुरेसे अन्न मिळत नसेल तर सरकार काय करते असा सवाल केला. प्रथम प्राधान्य योजनेचे आणि अंत्योदय योजनेतील उत्पन्न मर्यादा वाढवा, लाभार्थी उद्दिष्ट वाढवा अशी मागणी यावेळी केली.

त्यावर अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी उत्तर दिले. या सर्वांची तपासणी करून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही, याची काळजी घेऊ त्यासोबतच उद्दिष्ट कशाप्रकारे वाढवता येईल आणि उत्पन्न मर्यादेबाबत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले.

## दिल्लीतील कंपनीची ५ कोटींची सायबर फसवणूक ; मानवतमधून एकाला अटक



**मानवत (जि. परभणी) :** येथील एका जणाला दिल्ली पोलिसांनी ४ कोटी ९६ लाख रुपयांच्या फसवणुकीतील गुन्ह्याचा आरोपी म्हणून शुक्रवारी मानवतमधून अटक केली. दिल्ली पोलिसांनी सदर आरोपीस मानवत येथील न्यायालयात प्रस्तुत करून पुढील कारवाईसाठी ताब्यात घेतले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिल्ली येथे सायबर क्राइम सेलच्या स्पेशल युनिटकडे २७ नोव्हेंबर २०२४ रोजी राजस्थान अँटिबयोटिक्स लिमिटेड या कंपनीकडून ४ कोटी ९६ लाख रुपयांची फसवणूक झाली, म्हणून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला होता. यामध्ये अज्ञात व्यक्तीने त्याच्याकडे असलेल्या मोबाइल नंबरवरून संदेश पाठवत राजस्थान अँटिबायोटिक्स लिमिटेड या कंपनीचा एमडी असल्याचे भासवून वेगवेगळ्या क्रमांकांवर दोन आरटीजीएस करवून घेतले होते. त्यामध्ये एका अकाउंटवर १ कोटी ९६ लाख, तर दुसऱ्या अकाउंटवर ३ कोटी, असे एकूण ४ कोटी ९६ लाख रुपयांचे आरटीजीएस स्वतःच्या नावावर करवून घेतले होते.

**स्मृतिगंध** या साप्ताहिक वृत्तपत्राचे मालक, प्रकाशक आणि संपादक उजागरे लक्ष्मण सिद्धोधन यांनी मुद्रक सुनिता अंगदराव मोरे यांच्या प्रवीण प्रिंटिंग प्रेस, दुकान क्र. १४, सुपर मार्केट, कारेगाव रोड, परभणी (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून, पोहेटाकळी, ता. पाथरी, जि. परभणी, महाराष्ट्र – ४३१५०६ येथे प्रकाशित केले आहे. संपादक – उजागरे लक्ष्मण सिद्धोधन. मो. क्र. – ९४२१०१७११८. ईमेल – laxmanujagare592@gmail.com

**Smrutigandha** This weekly newspaper is printed by the owner, publisher, and editor Ujagare Laxman Siddhodhan at the printing press of Sunita Angadrao More, Pravin Printing Press, Shop No. 14, Super Market, Karegaon Road, Parbhani (Maharashtra), and published from Pohetakali, Taluka Pathri, District Parbhani, Maharashtra – 431506. Editor – Ujagare Laxman Siddhodhan. Mobile No. – 9421017118. Email – laxmanujagare592@gmail.com

Scanned with OKEN Scanner